जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
ईमेल :- cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र. ९८१९२०८२७९

प्रेस नोट दिनांक : १४/०४/२०२६

''एका महिलेस तिच्या घरावर काळी जादुटोणा केल्याचे सांगुन त्यावर उपाय करण्यासाठी व आर्थिक सुबत्ता येण्यासाठी अघोरी विधी करावी लागेल असे सांगुन वेळोवेळी रोख रक्कम व सोन्याचे दागिने असे सुमारे २.५० कोटी (अडीच कोटी) रुपयांची फसवणुक करणारा भोंदुबाबा मंजूनाथ बाबा उर्फ दिक्षीत बाबा यास गोवा राज्यातुन अटक''

गुन्हे शाखा, घटक-१, ठाणेची कामगिरी

कासारवडवली पोलीस ठाणे येथे महिला तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन आरोपी मंजुनाथ शेट्टी याने फिर्यादी व त्यांची आई यांना त्यांच्या वडीलांविरुध्द व पती विरुध्द त्यांच्या ऑफिसमधल्या महिलेने जादुटोणा केला असुन त्याचा अपघातात मृत्यु किंवा घातपात होईल अशी भिती घालुन त्यावर उपाय म्हणुन तसेच घरात आर्थिक सुबत्ता येण्यासाठी अघोरी पुजाविधी करावी लागेल असे सांगुन सुमारे रुपये २.५० कोटी (अडीच कोटी) व सोन्याच्या दागिन्यांची फसवणुक केले बाबत दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा रजिस्टर नंबर २३८/२०२६ भा.द.वि. कलम ४२०, ४०६, ३८६, सह महाराष्ट्र नरबळी व इतर अघोरी व अमानुष अनिष्ट प्रथा व जादूटोणा प्रतिबंध करण्यासाठी अधिनियम २०१३ चे कलम ३ प्रमाणे दि.०२/०४/२०२६ रोजी दाखल असून सदर गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवून गुन्हयाचा पुढील तपास गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला होता. नमूद गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखा, घटक.१, ठाणे चे पो.उपनिरी. प्रकाश शिरसाठ हे करीत आहेत.

नमूद आरोपी वापरत असलेल्या मोबाईलचे तांत्रिक विश्लेषणावरुन आरोपी हा गोवा राज्यात असल्याचे निदर्शनास आल्याने तात्काळ पोलीस पथक पाठवून आरोपी मंजुनाथ सुंदर शेट्टी उर्फ दिक्षीत बाबा, वय ३५ वर्ष, राहणार बोलीभिट्टी, पकलू, पेरीडर, जिल्हा -उडपी, कर्नाटक राज्य यांस ताब्यात घेऊन दिनांक १०/४/२०२६ रोजी अटक करण्यात आली. नमूद आरोपी याची मा. न्यायालयाने दि. १५/४/२०२६ पावेतो पोलीस कोठडी मंजूर आहे.

नमूद गुन्ह्याच्या तपासात यातील अटक आरोपी मंजूनाथ सुंदर शेट्टी उर्फ दिक्षीत बाबा हा महिलांशी ओळख वाढवुन त्यांचा विश्वास संपादन करुन त्यांच्याकडे पैशांची मागणी करुन त्यांची फसवणुक करीत असल्याचे तपासात निष्पन्न झाले असुन त्याच्याविरुध्द यापुर्वी माणिकपुर पोलीस ठाणे, वसई येथे महिलेच्या बलात्काराचा व पैशांचा अपहाराचा तसेच वर्तकनगर पोलीस ठाणे येथे महिलेच्या विनयभंग व पैशांची फसवणूक व अपहाराचा गुन्हा नोंद आहे.

नमूद आरोपी याने ठाणे, मुंबई परिसरातील अनेक महिलांना अशाच प्रकारच्या भूलथापा देऊन त्यांची देखील फसवणूक केल्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने पुढील तपास सुरु आहे.

नमुद पोलीस उप आयुक्त, गुन्हे, अमरसिंह जाधव व सहा. पोलीस आयुक्त, शोध-१, गुन्हे शाखा, ठाणे शेखर बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा घटक-१, ठाणेचे व.पो.निरी. सचिन गायकवाड, पो.उप निरी. प्रकाश शिरसाठ, पोहवा/धनंजय आहेर, पोहवा/मुकुंद आव्हाड, पोहवा/नंदकुमार पाटील, पोहवा/संदिप महाडिक, पोहवा/अविनाश पाटील, पोशि/सागर सुरळकर व मपोहवा/दिपाली जाधव, नेम. गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे यांनी केली आहे.